प्रति,

सहाय्यक संचालक, (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन,
नवीन प्रशासकिय भवन, १७ वा मजला,
मुंबई ४०० ००१.

क्रमांक— एसीबी/आ—२/विधी सल्लागार/जाहिरात/ ५७९९ दि. १५/०६/२०१७

विषय :— महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्थ विधि सल्लागार, १ पद कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणेबाबत.

.........

उपरोक्त विषयास अनुसरून महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विधि सल्लागार, १ पद कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व शासन निर्णय क्र.संकिर्ण १००३/ प्र.क्र.९६/२००३/१३ — अ, दिनांक १९/११/२००३ अन्वये वरील रिक्त पदांबाबतची जाहिरात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील इच्छुक असणाऱ्या उमेदवारांस समजण्यासाठी सर्व प्रसार माध्यमाव्दारे (वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे, दुरदर्शन, रेडिओ, नोटीस बोर्ड, इ.) प्रसिध्दीस देणे आवश्यक आहे. तरी विनंती की, सोबत खालील नमुद मसुदयाची जाहिरात वेगवेगळया दोन तारखांना राज्यातील मराठी, इंग्रजी प्रत्येकी दोन व इतर प्रसिध्दी माध्यमाव्दारे दिनांक ३०/०६/२०१७ पर्यंत कृपया प्रसिध्दीस देण्यात यावा.

मसुदा :— **"महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्थ विधि सल्लागार १ पद कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या करारावर भरावयाचे आहे. याबाबत सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना, अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिती** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **संकेत स्थळ ( WEB SITE ) www.acbmaharashtra.gov.in - येथे उपलब्ध असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी सदर पदांकरिता दि.१५/०७/२०१७ पर्यंत अर्ज करावेत."**

( वसंत देवरकर ) १५/६/१७
अपर पोलीस अधिक्षक (मुख्यालय),
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
म.राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रत,

पोलीस उप अधीक्षक /पोलीस निरीक्षक, (एटप), वेब साईड कक्ष,ला.प्र.वि.,म.राज्य,मुंबई

२/— यांनी सोबत जोडलेली विधी सल्लागार यांचे पद भरण्याबाबतची जाहीरात दि.१९/०६/२०१७ ते दि.१५/०७/२०१७ पर्यंत या कायाल्याच्या वेब साईड वर पी.डी.एफ. मध्ये प्रकाशित करण्यात यावी.

**महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यांचे आस्थापनेवर विधि सल्लागार यांचे खालील पद कंत्राट पध्दतीने नियुक्तीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.**

जाहिरात क्रमांक असीबी/आ-२/जाहिरात/२०१७ मुंबई, दि. /०६/२०१७

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई यांचे आस्थापनेवर विधि सल्लागार हे एक पद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या ठिकाणी ११ महिन्याच्या कंत्राट पध्दतीने भरावयाचे आहे.

सूचना :- याबाबतचे अर्ज अपर पोलीस अधिक्षक, (मुख्यालय) यांच्याकडे दिनांक १५/०७/२०१७ पूर्वी सादर करावेत.

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाप्यात घालून लिफाप्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात " विधि सल्लागार" च्या पदासाठी अर्ज असे नमूद करून दिनांक १५/०७/२०१७ पर्यंत महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई यांचे कार्यालय सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई (लक्षवेध :-अपर पोलीस अधिक्षक (मुख्यालय) या पत्त्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. दिनांक १५/०७ /२०१७ रोजी १७:३० वा. नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत. तसेच उमेदवारांनी त्यांचा सदर अर्ज पीडीएफ मध्ये फॉरमॅट करून acbwebmail@mahapolice.gov.in या ई - मेल आय डी वरीती सुध्दा पाठवावा.

टिप :- वर दर्शविलेल्या नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम पदाधिकाऱ्यास राहतील.

करारातील मासिक देय रक्कम :-

विधि सल्लागार या पदाकरिता करारातील मासिक देय रक्कम रू. २५,०००/- +दूरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रू. ३,०००/- असे एकुण रू.२८,०००/- दरमहा देय राहील.(उपनिर्दीष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**<u>विधि सल्लागार यांची शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा अनुभव.</u>**

१) उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.

२) विधि सल्लागार या पदांसाठी वकिली व्यवसायाचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

Prevention of Coruption Act . खालील गुन्हयातील खटले चालवण्याचा अनुभव आवश्यक आहे.

३) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४) उमेदवारास मराठी, हिंदी, व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान आवश्यक आहे. १/-

५) जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधिविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तिस गुन्हेगारी प्रशासकिय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकिय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**विधि सल्लागारांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२) सेवा विषयक/प्रशासकिय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती या बाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलांकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथ पत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्रधिकाऱ्यांची मान्यता घेवून न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून त्या अनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपिलांचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधि विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

**विधि सल्लागार पदाच्या अटी व शर्ती :-**

१) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शायकीय कर्मचारी /अधिकारी/म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा प्रत्येकी,११ महिन्यांकरिता) वाढविता येईल. ३ वेळा मुदत वाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिकाराच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) सदर अर्जाची छाननी झाल्यानंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल.

५) उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

६) नियुक्ती केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणार करारनामा (Agreement) रू.१००/- शुल्काच्या मुद्रांकावर (बॉण्ड पेपरवर) करणे अनिवार्य आहे

७) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

८) उमेदवारांनी वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वय मर्यादा व अनुभव या अटी दि. ३०/०६/२०१७ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

९) अर्जासोबत २.५ सें.मी. x. २.५ सें.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

१०) म.ना.से. रजा नियम नुसार ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवारांस कोणत्याही प्रकारची रजा देय असणार नाही.

३.

## महासंचालक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,

## अर्जाचा नमुना

विधि सल्लागार पदाकरिता अर्ज

नियुक्तीचे इच्छुक ठिकाण :- ............

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत जोडावा.

कार्यालयीन उपयोगासाठी.

१. अर्ज क्रमांक : | | | | |

२. अर्ज स्वीकारल्याचा दिनांक : | | | / | | | / | | | | |

३. अर्ज स्वीकारण्याऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) : ........................................................................................................................................................................

सुचना : १) अर्जदाराने अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

२) अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणी माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

३) आवश्यक नसेल तेथे खोडवे.

### अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : आडनांव नांव वडिलांचे नांव/पतीचे नाव

मराठीत : ..........................................................................................................

इंग्रजीत : | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२. पत्रव्यवहाराचा पत्ता : ......................................................................................................

तालुका : ............. जिल्हा : ...................... पीन कोड : | | | | | |

E-mail Address :.............

३ कायमचा पत्ता : ...............................................................................................................

तालुका : ............. जिल्हा : ...................... पीन कोड : | | | | | |

४. दूरध्वनी क्रमांक : लॅन्डलाईन ................................ मोबाईल क्रमांक :..........................................

५. जन्मदिनांक : | | | दिवस | | | महिना | | | वर्ष जन्मस्थळ : ..............................................…

६. दिनांक ३० /०६/२०१७ रोजीचे वय | | | वर्ष | | | महिना | | | दिवस

७. लिंग : पुरूष | | /महिला | |

८. धर्म : ............................................ जात : ..........................................

९. क्रिमीलेअर आहे काय : होय/नाही.

१० महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय ? होय [ ] नाही. [ ]

योग्य असेल त्या ठिकाणी ✓ अशी खुण करावी.

## (ब) अर्जदारची शैक्षणिक माहिती

११ शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय/महाविद्यालय) | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) | | | | | |
| २.उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधि पदवी | | | | | |
| ५. विधि पदयुत्तर पदवी | | | | | |

१२ इतर शैक्षणिक अर्हता : ........................................................................................

इतर शैक्षणिक अर्हता : ........................................................................................

संगणक प्रशिक्षित आहात काय ? होय [ ] नाही [ ]

१३. अर्जदाराची इतर माहिती :

अ. सनद घेतल्याचा दिनांक

ब. उमेदवाराचे स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशिल : ............................................

| अ. क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

*टिप वकिली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१४ अ अर्जदार यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबद्द करण्यात/बध्द करण्यात/दंड करण्यात/सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परिक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/ संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/काढून टाकण्यात आले आहे काय ?

| | |
|---|---|
| होय | |
| नाही | |

१४ ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? होय/नाही.

| | |
|---|---|
| होय | |
| नाही | |

(१४ - अ किंवा १४ - ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षा आदेश इत्यादींचा संपूर्ण तपशील आणि न्यायालयीन/ विद्यापीठ/ शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री./सौ/कु...........................................................................................याव्दारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरतीप्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

अर्जदाराची सही

दिनांक : (दिनांकासह)

सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.